# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:20.04.2026** **वारः सोमवार**

1. रस्ते सुरक्षेबाबत सर्वोच्च न्यायालयाकडून मार्गदर्शक तत्त्वांची घोषणा
2. यंदाच्या खरीप हंगामासाठी कृषी विभागाची पूर्वतयारी सुरू; आज पुण्यात कार्यशाळा
3. तामिळनाडूमध्ये फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या स्फोटात 23 कामगारांचा मृत्यू आणि
4. विदर्भात उष्णतेची लाट तर येत्या दोन दिवसात राज्याच्या बहुतांश भागात पावसाची शक्यता

**रस्ते-सन्या**

देशभरातील रस्ते सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण पावलं उचलत सर्वोच्च न्यायालयाने मार्गदर्शक तत्त्वांची घोषणा केली आहे. प्रशासकीय त्रुटी किंवा पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे द्रुतगती महामार्ग 'धोक्याचे मार्ग' बनू नयेत, असं स्पष्ट करत न्यायालयाने कडक निर्देश दिले आहेत. देशातील एकंदर रस्त्यांमध्ये राष्ट्रीय महामार्गांचा वाटा 2 टक्के असला तरी, रस्ते अपघातांमधील मृत्यूंपैकी जवळपास 30 टक्के मृत्यू याच महामार्गांवर होतात असं निरीक्षण न्यायमूर्ती जे के माहेश्वरी आणि ए एस चांदूरकर यांच्या खंडपीठाने नोंदवलं आहे. टाळता येण्याजोग्या कारणांमुळे एखाद्या व्यक्तीचा जीव जाणे हे यंत्रणेचं अपयश आहे, असं न्यायालयानं म्हटलं आहे.

कोणतेही जड किंवा व्यावसायिक वाहन राष्ट्रीय महामार्गावर किंवा त्याच्या कडेला उभं केलं जाणार नाही किंवा थांबवलं जाणार नाही; केवळ अधिकृत सुविधा केंद्रांवरच त्यांना थांबता येईल, असे निर्देश न्यायालयानं दिले आहेत. इतरही अनेक निर्देशांसह, न्यायालयानं राष्ट्रीय महामार्गांच्या हद्दीत कोणत्याही नवीन उपहारगृहाचं किंवा व्यावसायिक वास्तूचं बांधकाम किंवा कार्यान्वयन करण्यास तात्काळ प्रभावानं बंदी घातली आहे.

दरम्यान, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसंच सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना महामार्गावरील सुरक्षितता सुधारण्यासाठी तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत.

**खरीप**

राज्यात यंदाच्या खरीप हंगामात जास्तीत जास्त पेरणीचं नियोजन केलं असून त्यादृष्टीने कृषी विभागाने पूर्वतयारी सुरू केल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. 'एल निनोचा' शेतीवर होणारा संभाव्य परिणाम, पर्जन्यमानाची स्थिती आणि त्यानुसार पीक पद्धती यावर चर्चा करण्यासाठी पुण्यात राज्यस्तरीय कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं असून, शिवाजीनगर इथं 'सारथी'च्या नव्या सभागृहात आज सकाळी साडे दहा वाजता ही कार्यशाळा आयोजित केल्याची माहितीही भरणे यांनी दिली. कृषि विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि राज्यातील कृषि विद्यापीठांचे कुलगुरू या कार्यशाळेला उपस्थित राहणार आहेत.

**राज्यपाल-पालघर**

पालघरच्या सर्वांगीण विकासाशिवाय विकसित भारताचा संकल्प पूर्ण होऊ शकत नाही, असं प्रतिपादन राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी केलं आहे. पालघर जिल्ह्यातील डहाणू इथं वनबंधू ट्रस्ट आणि भारत विकास संगम यांच्या वतीने दुर्गम भागांसाठी फिरते दवाखाने आणि रुग्णवाहिका सेवांचं लोकार्पण काल करण्यात आलं; त्यावेळी ते बोलत होते. आरोग्य सुविधा दुर्गम भागात पोहोचवणे गरजेचं असल्याचं राज्यपालांनी यावेळी सांगितलं. रोजगार, पाणी आणि आरोग्य समस्यांवर उपाययोजना करून 'आदर्श गाव' संकल्पना राबविण्याची घोषणा देखील वर्मा यांनी यावेळी केली. त्याचबरोबर आदिवासी विकासासाठी प्रशासनासह, सर्वसमावेशक आराखडा तयार करण्यात येणार असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**आयटीआय-नागपूर**

नागपूर जिल्ह्यातील कामठी इथं शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि शासकीय तांत्रिक विद्यालयाच्या नवीन इमारतीचे लोकार्पण काल महसूल मंत्री आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. या संस्थेचे 'शहीद हेमंत करकरे' असे

नामकरणही काल करण्यात आलं. यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांची प्रमुख उपस्थिती होती. बदलत्या काळात रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या अनेक नव्या संधी निर्माण होत असून युवकांनी कौशल्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून जागतिक स्तरावर आपली क्षमता सिद्ध करावी असं बावनकुळे यांनी यावेळी सांगितलं. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना काळानुरूप कौशल्य प्रशिक्षण मिळावे यासाठी येत्या जूनपासून शासकीय आयटीआय आणि तांत्रिक संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा लोढा यांनी यावेळी केली.

**<u>सुनेत्रा पवार</u>**

बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी सध्या प्रचार सुरू आहे. दरम्यान सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी आपण मैदानात उतरल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी काल सांगितलं. राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते जनार्दन वाघमारे यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुबीयांची सांत्वनपर भेट घेण्यासाठी लातूरमध्ये आले असताना त्यांनी काल पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी महिला आरक्षण विधेयकावरून सत्ताधाऱ्यांवर टीका केली.

**<u>अहिल्यानगर</u>**

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभेच्या पोटनिवडणूकीसाठीही नेत्यांच्या प्रचार सभा होत आहेत. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार संतोष चाळके यांच्या प्रचारार्थ पक्षाचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी काल सभा घेतली. राहुरी अणि बारामतीमध्ये कॉंग्रेस पक्षाने उमेदवार उभा केला नाही, त्यामुळे त्यांनी या दोन्ही जागांवर वंचितला पाठींबा द्यावा असं आवाहन आंबेडकर यांनी केलं. यावेळी त्यांनी सरकारवर टीका केली.

**<u>अक्षय्य तृतीया</u>**

राज्यात सर्वत्र काल अक्षय्य तृतीयेचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. साडेतीन मुहुर्तांपैकी एक असलेला हा सण, सुख आणि समृद्धीचं प्रतीक मानला जातो. या मुहूर्तावर ठीकठिकाणी सोने-चांदी आणि वाहन खरेदीसाठी ग्राहकांनी गर्दी केल्याचं चित्र दिसून आलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनतेला अक्षय तृतीयेच्या शुभेच्छा दिल्या.

**<u>बसवेश्वर जयंती</u>**

राज्यात सर्वत्र काल भगवान परशुराम आणि जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंतीही उत्साहात साजरी करण्यात आली. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी मुंबईत तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर इथल्या शासकीय निवासस्थानी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केलं. परशुराम जन्मोत्सवाच्या निमित्ताने पुण्यातील विविध ब्राह्मण संस्था, संघटनांनी दुचाकी फेरीचं आयोजन केलं होतं. सोलापूरमध्ये महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त मिरवणूक काढण्यात आली.

**<u>परवाने निलंबन-वाशिम</u>**

वाशीम जिल्ह्यात 555 मेट्रिक टन DAP खत विक्री केल्या प्रकरणी 8 कृषी केंद्राचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तर 4 कृषि केंद्राना कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. खरीप हंगामाच्या तयारी पूर्वीच विक्री झाल्याने ही कारवाई करण्यात आली आहे.

**<u>अपघात</u>**

तामिळनाडूमध्ये मुथुलिंगापुरम इथल्या एका फटाक्यांच्या कारखान्यात काल झालेल्या स्फोटात 23 कामगारांचा मृत्यू झाला तर 6 जण गंभीर जखमी झाले आहेत.

कारखान्यातला ज्वलनशील रासायनिक पदार्थ हलवला जात असताना हा स्फोट झाला. दुर्घटनेतल्या मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. तामिळनाडूमधल्या दुर्घटनेत झालेल्या जीवित हानीबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

**<u>अजित आगरकर-मुंबई</u>**

बीसीसीआय अर्थात भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं वरिष्ठ निवड समितीचे अध्यक्ष म्हणून अजित आगरकर यांचा कार्यकाळ एका वर्षानं वाढवला आहे. 2027 च्या क्रिकेट विश्वचषकाच्या तयारीच्या दृष्टीनं हा निर्णय घेतला असल्याचं नियामक मंडळानं म्हटलं आहे. जुलै 2023 मध्ये आगरकर यांची वरिष्ठ निवड समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली होती. त्यानंतर त्यांच्या आत्तापर्यंतच्या

कार्यकाळात निवडलेल्या भारतीय संघांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या वतीनं आयोजित चार स्पर्धांच्या अंतिम फेरीत धडक मारली, आणि त्यापैकी दोन टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक तसंच, एका आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचं विजेतेपदही पटकावलं आहे.

**<u>अकोला-तापमान</u>**

अकोला जिल्ह्यात गेल्या चार पाच दिवसांपासून उष्णता प्रचंड वाढली असून कमाल तापमानाने 45 अंश सेल्सिअसचा टप्पा गाठला आहे.  प्रचंड उष्णता असल्यामुळे नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचं आवाहन जिल्हा प्रशासनाने केलं आहे. दुपारी बारा ते चार या वेळेत बाहेर जाणं टाळावं, वारंवार पाणी प्यावं अशा सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.

**<u>ऊन</u>**

चंद्रपूर जिल्ह्यातही वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर सर्व शाळा आणि महाविद्यालयांच्या वेळांमध्ये तात्पुरता बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्व शाळा आणि महाविद्यालये सकाळी 11 वाजेपर्यंतच सुरू ठेवण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी दिले आहेत.

गोंदिया जिल्ह्यातही तापमान 43 अंशांच्या पुढे गेले असून वाहतूक विभागाने दुपारच्या वेळेत सिग्नल यंत्रणा बंद ठेवली आहे.

**<u>पाऊस-सांगली</u>**

दरम्यान राज्याच्या काही भागात काल पावसानं हजेरी लावली. सांगली जिल्ह्यात मिरज आणि कवठेमहांकाळ तालुक्यातील काही भागात काल संध्याकाळी  हलका पाऊस पडला. त्यामुळे हवेत काही प्रमाणात गारवा निर्माण झाला.

**<u>सोलापूर</u>**

सोलापूरमध्ये काल दिवसभर उन्हाची काहिली जाणवत असताना संध्याकाळी मेघगर्जनेसह जोरदार पाऊस पडला. उत्तर सोलापूर तालुक्यातील तळे हिप्परगा गावात घरावरील पत्रे अंगावर पडून एका लहान मुलाचा मृत्यू झाला आहे.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात येत्या 25 तारखेपर्यंत, तर विदर्भात 22 तारखेपर्यंत तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर राज्याच्या कृषी विभागाने शेतकऱ्यांना सतर्कतेचा इशारा दिला असून काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी ठेवावीत असं आवाहन करण्यात आलं आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**